## हिंजवडी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड
## प्रेसनोट ता. ०३/०८/२०२२

हिंजवडी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये दिनांक १५/०७/२०२२ रोजी सायंकाळी १९/३० वा.चे पुर्वी माण रोडकडून महाळूंगे गावाकडे जाणाऱ्या रोडचे डाव्या बाजूस कठडयाजवळ कचऱ्याचे ढिगाऱ्यावर,रोहन बिल्डर यांचे सर्व्हे नं.१८७ जागेमध्ये, हिंजवडी पुणे या ठिकाणी एका अनोळखी इसम त्याचा चेहरा व तोंड छिन्नविछन्न असलेले, मान उजव्या बाजूकडून पाठीमागील तूटलेली, डावा हात दंडापासून नसलेला, उजव्या पायाच्या नडगीवर आणी पाठीवर मोठया प्रमाणात जखम व त्याचे अंगावर व उजव्या हाताचे दंडावर गोंदल्याच्या अस्पष्ट खुणा असलेली मयत बॉडी मिळून आली. वैद्यकीय अधिकारी ससून हॉस्पीटल यांनी पोस्ट मार्टम करून मयताचे मरणाचे कारण Death due to multiple Injuries in a case of assault असे कारण दिले. त्याप्रमाणे रविंद्र सुखदेव मुदळ, पोलीस उप निरीक्षक नेमणुक- हिंजवडी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड यांनी सरकारतर्फे लेखी फिर्याद दिल्यावरून हिंजवडी पो.स्टे. गुन्हा रजिस्टर नंबर ६६२/२०२२ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

हिंजवडी पोलीस ठाणेस गंभीर गुन्हा दाखल झाल्याने मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री मुगळीकर यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री देशमुख, पोलीस निरीक्षक गुन्हे दहिफळे यांनी दिलेल्या सुचना नुसार सदर अनोळखी मयत बॉडीची ओळख व त्याचा खून करणाऱ्याचा शोध घेणेकरीता सहा पोलीस निरीक्षक काटे व सहा पोलीस निरीक्षक गोमारे यांचे सोबत अंमलदार अशा दोन तपास टिम नेमण्यात आल्या. अनोळखी मयताचा डावा हात खांदयापासून तुटलेला होता व तो अपंग होता या शरिर वर्णनानूसार कौशल्याने तपास करून, आरोपी निष्पन्न केला पुढे तपासात निष्पन्न झाले की, आरोपी निलेश सतीश धुमाळ व मयत हे दारू पिणेसाठी अशोक कंट्रीबारचे पाठीमागील बाजूस दारू पित बसले होते. दारू पित असताना मयताकडून निलेश धुमाळ याचा दारूचा ग्लास सांडला या कारणावरून निलेश धुमाळने काठीने व दारुच्या बाटलीने तोंडावर व डोक्यावर तसेच शरीराचे इतर भागावर मारहाण करुन जखमी करुन ठार मारून तो त्या ठिक्‍ाणाहून पळून गेल्याचे निष्पन्न झाले. मयत हा फिरस्ता असून त्याचे नाव बालाजी नांदेडचा राहणारा एवढीच त्याची ओळख पटली आहे. तो झाडू मारण्याचे काम करत होता.

घटनास्थळाचे आजुबाजुचे सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता त्यात एक पांढऱ्या रंगाची चारचाकी गाडी जाताना दिसली होती त्या आधारे सपोनि काटे, सपोनि गोमारे यांनी व त्यांच्या डी.बी स्टाफने कौशल्यपुर्ण तपास करून त्या गाडीचा क्रमांक एम एच १४ सीडी १५०६ हा शोधून काढला त्यानंतर तपासात निष्पन्न झाले की, मयत इसमाचे प्रेत हे ड्रायव्हर राजेंद्र थोरात व कंट्रीबार येथे कामाला असणारे पाहिजे आरोपी आखील व धर्मेंद्र यांनी गाडीत कचऱ्यासोबत भरून माण महाळूंगे रोडला कचऱ्याच्या ढिगाऱ्यात टाकून दिले होते. त्याप्रमाणे आरोपींनी पुरावा नष्ट केलेबाबत गुन्हयामध्ये भादवि कलम २०१, ३४ हे कलम वाढ करण्यात आली आहे. यातील मयताची पुर्ण ओळख पटविणेबाबत तपास चालू आहे.

सदरची कारवाई मा. अंकूश शिंदे सो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. डॉ संजय शिंदे सो, अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. आनंद भोईटे, पोलीस उप आयुक्त परि. २, पिंपरी चिंचवड मा. श्रीकांत डिसले सो, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग वाकड, यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, डॉ. विवेक मुगळीकर, सुनिल दहिफळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सोन्याबापु देशमुख पोलीस निरीक्षक (गुन्हे), तपास पथकाचे प्रमुख सपोनि, सागर काटे, सपोनि गोमारे, सहा.पोलीस उप-निरिक्षक बंडु मारणे, पोलीस अंमलदार बाळकृष्ण शिंदे, कैलास केंगले, रितेश कोळी, अरूण नरळे, चंद्रकांत गडदे, श्रीकांत चव्हाण, कारभारी पालवे, ओमप्रकाश कांबळे, अमर राणे, दत्ता शिंदे, सुभाष गुरव, यांनी केली आहे.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त परि-२,
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड,